# स्वगत

कुसुमाग्रज

१९६२
... ग्रं. सं. ठाणे
१५५६
REFBK-0012747
REFBK-0012747

अनुक्रम ३२३७८
काव्य
क्रमांक ९५५५
९२७८०
REFBK-0012747
REFBK-0012747

# स्वगत

कविता - संग्रह

कुसुमाग्रज

कॉन्टिनेन्टल प्रकाशन : पुणें.

स्वगत : © वि. वा. शिरवाडकर. पहिली आवृत्ति : २६ जानेवारी १९६२.
चित्रकार : दीनानाथ दलाल, मुंबई. किंमत : साडेतीन रुपये.
प्रकाशक : अ. अं. कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, टिळक रोड, पुणें २.
मुद्रक : वि. नी. पटवर्धन, साधना प्रेस, ४३०-३१ शनवार, पुणें २.

कविवर्य

श्री. बा. भ. बोरकर

यांस स्नेहपूर्वक —

# स्वगत

अनुक्रम


| | |
|---|---|
| ध्रुवपद | १ |
| खुलदाबाद | ४ |
| तेहि असे | ६ |
| मौन | ७ |
| शिवाजी | ८ |
| आग्र्याचे किल्ल्यांत | १० |
| तिन्हीसांजाच्या मेघावरून | १२ |
| लाट तेजाची | १४ |
| अनोळखी | १६ |
| प्रवास | १७ |
| छंद | १८ |
| निराकार | १९ |
| शर | २० |
| आश्वासन | २१ |
| जोगीण | २२ |
| सांची : १ | २३ |
| सांची : २ | २४ |
| मला हवा तो | २६ |
| पराभव | २७ |
| बंडखोर | २८ |
| मवाली | ३० |
| बापू गोखले | ३२ |
| पुनव | ३४ |
| वेगळें | ३५ |
| बाजीराव | ३६ |
| गीत | ३८ |
| अरूप | ३९ |
| पणती | ४० |
| स्पर्श | ४१ |

32366 काव्य
9446 नों. दि. 8/3/62

अनुक्रम

| | |
|---|---|
| यमुना | ४२ |
| ताज | ४४ |
| कैलास लेण्यांत | ४६ |
| माता | ४८ |
| पांथस्थ | ५० |
| जाणीव | ५१ |
| माध्याह्न | ५२ |
| अंधार | ५३ |
| नाटक | ५४ |
| जलाशय | ५५ |
| औरंगाबाद | ५६ |
| यंत्र | ५७ |
| परतफेड | ५८ |
| तृणाचें पातें | ५९ |
| परंतु | ६१ |
| नदी | ६२ |
| ऐनेमहाल | ६४ |
| नांदी | ६६ |
| सीमेवर | ६७ |
| अगतिक | ६९ |
| स्वधर्म | ७१ |
| कबूतर | ७२ |
| रस्ते | ७३ |
| एक फटाका | ७४ |
| दिवे | ७५ |
| पाणी | ७६ |
| गति | ७७ |
| ईशावास्यम् | ७८ |
| राजा आणि मंत्री | ८१ |
| आम्हां घरीं | ८२ |

## ध्रुवपद

हें सारें खरें असेल
अथवा आहेहि
पण तरीहि—
माझ्या गीताचें ध्रुवपद एकच आहे,
माणसाच्या माथ्यावर
दारिद्र्यासारखा शाप नाहीं
पृथ्वीच्या पाठीवर
इतकें अमंगल, इतकें दुःखदायक, इतकें भेसूर
दुसरें पाप नाहीं !
जोंपर्यंत माझ्याजवळ गीतासाठीं शब्द आहेत,
शब्दासाठीं श्वास आहे
तोंपर्यंत—
याच ध्रुवपदाचा, याच ध्रुवपदाचा
माझ्या गीताला ध्यास आहे !

हें सारें खरें असेल
अथवा आहेहि—
आणि तरीहि—
पापणीच्या केसांत अडकलेल्या या थेंबाकडे
तिऱ्हाईतपणें पाहूं नका
मातीचीं आसवें मातीला मिळतील
असें म्हणूं नका
दगडाच्या डोळ्यावरील हें दंव ओलांडून

पुढें जाऊं नका—
कारण—

या रडणाऱ्या मातीच्या गर्भांत
धसधसत आहेत
पांची खंड पृथ्वी हलविणारे
शेष-कालियासारखे सहस्रावधि नाग
या दगडांच्या उशीवर माथें ठेवून झोपली आहे
लक्ष दावानलांची आग !
त्या नागांना नाहीं देश
त्या अग्नीला नाहीं संस्कृति
नाहीं देव, नाहीं धर्म, नाहीं नीति
त्यांच्याजवळ आहे केवळ
गति !
आंधळी गति !
आपल्या जहरी जिभांनीं, जांभळ्या ओठांनीं
जीवनांतील सारें सौंदर्य पिऊन टाकणारी
राक्षसी गति—

भूमीवर पडलेल्या देवळांच्या अवशेषांवरून
पलंगावर पडलेल्या स्त्रियांच्या स्तनांवरून
उन्मत्तपणें धावणारी
बेहोष गति !
कचकड्यांच्या बाहुल्यांचा
प्लॅस्टिकच्या रंगीत खेळण्यांचा
हा सारा संसार
चरणाखालीं चिरडीत जाणारी
निर्दय गति !

ती थांबणार नाहीं
        न्यायाच्या मंदिरापुढें
        शांतीच्या स्तंभापुढें
आकाशरसानें भरलेल्या
        वाङ्मयाच्या कुंभापुढें !
आणि म्हणून सांगतों
हें सारें खरें असेल
पण तरीहि—

## खुलदाबाद

असलें गांव
मीं कधींच पाहिलें नव्हतें—
कालसागराच्या किनाऱ्यावर
लहानशी दिवली लावून
जें बसलें आहे जागत,
येत्याजात्या पांथस्थाकडे
शेवाळलेल्या नजरेनें
आण्या-पैशाचें दान मागत.
असलें गांव
मीं कधींच पाहिलें नव्हतें
जीवन जगतें आहे येथें
मृत्यूच्या दयेवर,
दृष्टि पडेल तेथें उभें आहे
विशाल विस्कटलेल्या वास्तूचें
उघडें बोडकें कलेवर,
इतिहासाचा हिरवा काळा द्रव
येथें पडला आहे थिजून
प्रत्येक शिलेवर !
रस्त्यावर, झाडावर
आणि माणसावरहि !

गांवाच्या दारावरून
एक नदी वाहते आहे
वटारलेल्या खडकाच्या डोळ्यांनीं
सारखी पाहते आहे
मातीनें माखलेल्या
    वेडसर वेशीकडे
जी उभी आहे केस पिंजारून
ऐतिहासिक आवेशांत
जिच्या साकळलेल्या जाणिवेला
पाहतां येत नाहीं
पाठीशीं पडलेल्या दगडविटांच्या राशीकडे !

असलें विलक्षण गांव
मीं कधींच पाहिलें नव्हतें
उसवलेल्या थडग्यांतून बाहेर स्रवणारा काळोख
ओहळतो आहे प्रकाशांत
धूळ खाऊन जडावलेले ढग
डोळे मिटून बसले आहेत
आकाशांत
वर्तमानकाळाच्या साऱ्या रेषा
अशब्द होऊन शिरत आहेत
भूतकाळाच्या नकाशांत.

## तेहि असे –

तुझ्या अधरकपोलावरील उषःकाल
    टिपून घ्यावे ओठांनीं
    तेहि असे –
दुपारच्या राखी आभाळाला फुटावींत
केशरी
किनखापी पिसें
आणि
जावें घटकाभर चितळून
ओल्या सोनेरी सावल्यांत
पृथ्वीवर साचलेलें
    उन्हाचें शिसें.

## मौन

शब्द – जीवनाचीं अपत्यें –
मृत्यूपर्यंत पोहोंचत नाहींत
म्हणून तुझ्या समाधीवर
मी वाहात आहें
माझें मौन.

मृत्यूसारखेंच अथांग
अस्पष्ट अनाकार,
सारें आकाश व्यापून
अज्ञानाच्या प्रदेशाकडे
प्रवाहत जाणाऱ्या
स्वरहीन संथ मेघमालेचें
मौन.

## शिवाजी

नांव तुझें ऐकतांच जुळती
यांत्रिकतेनें कर छातीवर
जयघोषाचा महामंत्र तव
लिहिला आम्हीं शिळेशिळेवर
या मातीवर.

पाठ्यपुस्तकामधून रचलीं
नवरस भरुनी तुझी कहाणी
दिले उभारुनि पुतळे सुंदर
शिवेशिवेवर नगरोद्यानीं,
सभागृहांतुन—
तव महिम्याचीं रुणझुणतीं तीं
वाद्यगणाच्या साथीवरतीं
सुस्वर गाणीं.

या सर्वांतुनि हन्त आर्पिला
देवपणा तुजला अवतारी
माणुसतेच्या पुसल्या रेषा
उरे प्रणामापुरती प्रतिमा
संगमरवरी.

जी गत झाली—
दाशरथाची नंदसुताची

सिद्धार्थाची ज्ञानेशाची
पुराणकाळीं.

आज नको तीं देवदेवळें
तुझ्या जीवनांतली हवी ती
जिवंत शिकवण
मनें द्यावया मृत मातीला
सनातनाच्या जुलुमावरती
घालाया घण
ये गीतांतुन, ये ग्रंथांतुन
मंदिरांतुनी ये रस्त्यावर
उद्यानांतिल शिल्पामधुनी
ये माळावर
तुझ्या करांतिल अमर दिव्याचा
प्रकाश पडुं दे
या भूमीवर, या काळावर.

## आग्र्याच्या किल्ल्यांत —

या जमिनीवर
या जमिनीवर असेल तेव्हां
प्रिय माझ्या त्या शककर्त्यांचें
पडलें पाउल
या भूमीच्या सुगंधसिंचित
धूलिकणांना
या भिंतीवर रुळझुळणाऱ्या
गर्भरेशमी आवरणांना
या मंचांतिल रत्नमण्यांच्या
चंचल गर्वोद्धत किरणांना
सह्याद्रीवर अवतरलेल्या
ऊर्जस्वल स्वातंत्र्य उषेची
इथें लागली
पहिली चाहुल.

याच ठिकाणीं —
मावळखोऱ्यामधलें वादळ
इंद्रसभेवर या आदळलें
कृष्णेचें जळ खडकामधलें
यमुनेच्या श्रीमंत तटावर
येथें वळलें
इथें तमाच्या अधिराज्याला
तेजाचें बळ प्रथमच कळलें.

अनुक्र. 32360 दि. काव्य
क्रमांक ......9445...... नों. दि. ८/

येथ रुजाम्यावरी जरीच्या
असतिल कुजबुजल्या तलवारी
थरथरले शिरताज हिऱ्यांचे
असतिल ऐकुनी ती ललकारी
संगमरवरी चिऱ्यांत झालें
असेल स्पंदन
शिवनेरीच्या वनराजाचें
होतां दर्शन !

या स्तंभांतुनि असेल घुमली
ती शिववाणी
या दगडांवर असेल थिजलें
त्या शब्दांतिल अभिमानाचें
जळतें पाणी
मखमाली गाद्यांवर सळसळ
संतापाची असेल उठली
माळ करांतिल या तख्तावर
असेल तुटली
काच बिलोरी ऐश्वर्याची
पोलादाच्या त्या तुकड्यावर
इथेंच फुटली.

# तिन्हीसांजाच्या मेघावरून

तिन्हीसांजाच्या मेघावरून
पृथ्वीवर उतरलेल्या सावल्या
क्षितिजाच्या वळचणीखालीं
उभ्या राहून
मला खुणावीत आहेत
अस्पष्ट हलक्या स्वरांत
सांगत आहेत
असलें कांहीं करूं नकोस
आकाशनदीच्या तीरावर उमललेलें
स्वप्नपुष्प
मातीच्या शब्दामध्यें धरूं नकोस
विजयाच्या एका क्षणासाठीं.

चांदण्याचें धुरकें वस्त्र लेऊन
किनाऱ्याच्या कुशींत रेंगाळणारी
ही सरिता
दूरस्थ पर्वताच्या शिखरावर
अभ्रखंडाला रेलून बसलेली
ती निळी देवता

वडाच्या पारंब्यांना धरून
जमिनीवर सरसरणाऱ्या
काळोखाच्या धारा
रत्नांचा दिवा हातांत घेऊन
पूर्वाकाशांत गस्त घालणारा
व्याधाचा तारा
सर्वजण माझ्या कानाशीं
कुजबुजत आहेत
आर्त व्याकुळ आवाजांत,
असलें कांहीं करूं नकोस
इंद्रलोकांतून अवतरलेला हा सुवर्णपक्षी
धनुष्य उचलून मारूं नकोस
सोन्याच्या क्षुद्र धनासाठीं.

## लाट तेजाची

मव्या जीवनाचा नाद
  मला ऐकूं येत आहे
लक्ष शून्यांतुनि कांहीं
  श्रेय आकारत आहे.

क्षितिजाच्या काळोखाला
  फुटे सुवर्णाचें पान
आकाशाच्या ओंजळींत
  पडे किरणांचें दान.

गेल्या दिवसानें दिली
  येत्या दिवसाला हाक
अभावांत रुतलेलें
  हालें चैतन्याचें चाक.

दऱ्याखोऱ्यांत रानांत
  लाट तेजाची वाहते
लोहरसांत गर्वाच्या
  दीन दारिद्य नाहतें.

पायतळीं पाषाणास
  आहे कांहीं म्हणायचें
संपलें तें पर्व आतां
  रडायचें, कण्हायचें.

माती हालते शेतांत
पाणी पिऊन मेघांचें
चिखलाच्या नेत्रावर
स्वप्न सोनेरी रेघांचें.

धरतीच्या उदरांत
आली कोळशाला जाग
अंग आसुसलें त्याचें
व्हाया इंधनाची आग.

गंध प्रकाशाचा स्वर
त्यांत झंकारत आहे
लक्ष शून्यांतुनि कांहीं
श्रेय आकारत आहे.

# अनोळखी

हजार डोळ्यांमधलें पाणी
माझ्या डोळ्यांमधें जमे

हजार कंठांतील घोषणा
माझ्या कंठामधें घुमे

हजार देहांतील वेदना
माझ्याही देहांत जळे

हजार हातांचें अभिवादन
माझाही अभिमान गळे

हजार हृदयें गहिंवरतीं तर
मन माझेंही गहिंवरतें

असें हजारासंगें आहे
जडलेलें माझें नातें

असेंच आहे आणि तरीही
अनोळखी मी सदाच राही

दूर हजारापासुनि आहे
विजनामधि माझें घरटें.

मीपण भरलें जयांत माझें
जें आहे माझ्यापुरतें.

## प्रवास

प्रवास सरला अवकाशांतिल
पृथ्वीवरती आलों आपण
धुळींत झालें विलीन आतां
अखेर ताऱ्यांचें तारेपण.
यांतहि आहे
सांत्वन कांहीं—
भीतिहि आतां मावळली ती
निरालंबतेमधें नभाच्या
अगतिकतेनें विश्रांतीविन
श्रमावयाची
श्रमतां श्रमतां पोकळींत त्या
सर्वस्वाची करून ज्वाला
जळावयाची.

# छंद

छंद मला प्रवासाचा
हृदयांच्या मुलखांत
आडवाट मुशाफरी
करण्याचा.

माझ्या स्वैर जहाजांत
इंद्रधनुष्यांच्या राशी
भावनांच्या देशोदेशीं
भरण्याचा.

छंद मला वाळवंटीं
ग्रीष्मासह चालण्याचा
अनोळखी रेतीमध्यें
जळण्याचा.

छंद मला काळोखाच्या
भुयारांत भ्रमण्याचा
पातकांच्या मैफलींत
रमण्याचा.

छंद मला तारांगणीं
तेलदिवा लावण्याचा
आकाशाच्या असीमांत
मावण्याचा.

# निराकार

या दुःखाला नाहीं आकार
नाहीं रंग, नाहीं नांव —
तें आहे माझें
पण मी ओळखत नाहीं त्याला
आणि नसशील ओळखत तूंहि
मला माहीत आहे इतकेंच —
तुझा रुपेरी रथ दूर जात असतां
या क्षितिजावर जो तरंगत होता
                निळापांढरा मेघ
त्या मेघांतच जन्म झाला
                या निराकार दुःखाचा
आणि त्या मेघाप्रमाणेंच —
तें फिरतें आहे आकाशाच्या पोकळींत
शोधीत स्वतःसाठीं
एखादें नांव, एखादी रेषा —
                एखादी आकृति.

# शर

क्षणासाठीं झालों
        मीहि बाजीराव
मस्तानी झालीस
        तूंहि क्षणभर
लकाकलीं क्षण
        निळीं आकाशितें
क्षणामधें आलों
        पुन्हा पृथ्वीवर
तुझ्या महालांत
        लोपलीस तूंहि —
तळावर गेली
        माझी राहुटीहि —
सारें शांत झालें
        तुला मला मिळे
मन रिझवाया
        हौतात्म्याचा शर

## आश्वासन

हरवुनि गेला सगळा सागर
निळयाजांभळया पुसल्या रेषा
अस्तित्वास्तव उरली केवळ
तमांत गुदमरलेली भाषा
रंग घेउनी गेली संध्या
अस्तादिशेवर उलगडलेले
रंग तरूंचे, रंग घरांचे
रंग किनाऱ्यावर पडलेले
चराचरांचीं विरलीं रूपें
देहावांचुनि छाया भ्रमती
ससे दिव्यांचे बावरलेले
बिळांत काळोखाच्या शिरती.
अभावास या उरलें आहे
एकच आकाशीं आश्वासन
कडा ढगाची चांदवणारें
चंद्रकराचें अस्फुट दर्शन.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ज्ञा. क्र. 92680

## जोगीण

मला हवी आहे नास्तिकता
पण सहस्र वर्षे
मनाला मिठी घालून बसलेली
ही अस्तिकता होत नाहीं दूर
माझ्यापासून.
रंगमंचावरील दिव्यांच्या प्रकाशांत
व्याधाच्या नक्षत्रासारखी
        विविध रंगांत उमलणारी
सुरेल पदन्यास करीत
माझ्या अंतःकरणांत प्रवेश करणारी
ती मोहक नृत्यांगना
उभी आहे माझ्या मंदिराच्या दाराशीं.
पण मलीन वस्त्रें परिधान करून
गहन काळोखांत गुरफटलेली
एकतारीवर एकच एक गीत गाणारी
ही उदासी मितभाषी जोगीण
मान टेकून दरवाजाच्या स्तंभावरती
बसली आहे वाट आडवून
        प्रवेशाच्या पायरीवर.

## सांची : १

प्राचीन काळीं—
राजमंदिरांत राहणारें
पृथ्वीवर सार्वभौमत्व मिरविणारें
हें सनातन धर्मतत्त्व
मानवानें केलेल्या आपल्या
पराभवाकडे
पाठ फिरवून
या विजनांत बसलें आहे
शांत, अचेतन!
सूर्याबरोबर जागण्यासाठीं
रात्रीच्या काळोखांत विसावण्यासाठीं
अंगावरील पाषाणाचीं जीर्ण राजवस्त्रें सावरीत
येत्या जात्या यात्रिकासाठीं!
तेवढाच आधार
आज उरला आहे त्याला—
रेलतळावरील भलावणीचा
वृत्त-पत्रांतील जाहिरातीचा,
ताजमहाल, कुतुबमिनार, भाक्रा-नांगल
पाहून आलेल्य
पांथस्थाच्या कुतूहलाचा,
टेकडीच्या पायथ्याशीं असलेल्या
विलासी डाक बंगल्यांचा,
स्वतःच्या जिवंतपणाचा नव्हे
तर हन्त केवळ जुनेपणाचा!

## सांची : २

संसाराच्या सीमेवरील
या हवेच्या कुशीला बिलगत नाहींत
पार्थिव स्वरांचीं वर्तुळें
रांगत्या अक्षरांच्या रेषा,
हिच्या निरभ्र राखी चेहऱ्यावर लहरत नाहीं
मातीनें माखलेली एखादी भावना
एखादी अभिलाषा.
ऐहिकाच्या पायखुणा उमटत नाहींत
येथील पिवळ्या तृणाच्या पानावर
दूरस्थ मठांतिल घंटानादाशिवाय
अन्य आवाज पडत नाहींत
या उदासीन एकाकी वृक्षांच्या कानावर
स्थितप्रज्ञतेनें जडावलेल्या वातावरणांत
विशाल खडकाळ टेकडीच्या माथ्यावर
हा स्तूप बसला आहे शांत अविचल
शिल्पचित्रांचा पिसारा फुलवून
अनेक युगांचीं वारुळें अंगावर घेऊन
अव्यभिचारी एकांतांत.

आकाशाच्या गर्भभागांत घुसलेल्या
हिमालयांतील पहाडाच्या
अरुंद निःशब्द सुळक्यावर
आपल्या पंखावरून चोच फिरवीत बसलेल्या
आत्मतुष्ट एकाकी
गरुडासारखा !
क्षितिजावरील जहाजांच्या कृष्णाकृति
ज्याला दिसतात, पण जाणवत नाहींत
सूर्याच्या उन्हांत जें महामत्स्याप्रमाणें
लखलखत पडतें
आणि रात्रीच्या काळोखांत
स्वतःसहि हरवून बसतें
अशा कोणाला न गवसलेल्या
दक्षिण महासागरांतील —
एखाद्या हिममय बेटासारखा !
ही आहे अगतिकता
स्थितप्रज्ञता —
कीं शतकाशतकांतुन साचलेला पराभव ?

## मला हवा तो —

मला हवा तो हाहि नव्हे
        तोहि नव्हे

भूप पथांतुनि मिरवित जातो
तपोवनीं जो यती राहतो
साधुसंत वा रावरंक वा—
        तोहि नव्हे.

धुक्यांत गहिऱ्या हलती रेषा
सांध्यघनावर ज्याची भाषा
मध्यरात्रिच्या दिव्यास दिसतो—
        तोहि नव्हे.

जो चित्रांतुनि हो आकारित
शब्द जयाला देती जीवित
अंकित आश्रित जो प्रतिभेचा
        तोहि नव्हे.

कसा असे तो कळलें नाहीं
ध्यान तयाचें करितां ग्वाही
एक मना कीं तयासारखा —
        तोहि नव्हे.

म्हणुनि साजणी मी अविवाहित
दिव्य सुखा त्या सदैव वंचित
कुंवारपण मम गात बैसलें —
        हाहि नव्हे, तोहि नव्हे.

# पराभव

असला दिवस
असला दिनान्त
परत केधवा
येणार नाहीं
असला उन्माद
असला प्रमाद
परग केधवा
होणार नाहीं.
रेशमी वाऱ्याचा
अंधुक ताऱ्यांचा
विनोदी वृक्षांचा
होता तो डाव
तृणाची नवती
गंधित धरती
साऱ्यांच्या समोर
हो पराभव.

## बंडखोर

बंडखोर हे असेच येती
तृणापरी वेदीवर जळती
त्या ज्वलनानें जीर्ण भवाला
नव्या युगाचा प्रकाश देती

बंडखोर हे असेच जगती
मरण ललाटावरती घेउन
ना दिसतें, ना असतें, त्यास्तव
समिधेपरि हें अर्पित जीवन.

पृथ्वीवर येण्यापूर्वी हे
सोमसुरेचा पितात पेला
दिव्य कैफ तो, उरतो आत्मा
अर्थ न राही शरीरतेला.

निज काळाच्या कुशीमधें हे
सलती खुपती शुलाप्रमाणें
नगर-शिवेवर निवास यांना
सीमाशासित खलाप्रमाणें.

हे अनयाचे आक्रमणाचे
दास्याचे जुलुमाचे वैरी
लौकिक धन वा विश्रांती ना
उभीं राहतीं यांच्या द्वारीं.

बंडखोर हे असे कलंदर
जनांत राहुनि हे वनवासी
ईश्वर जेथें भुलतो, चुकतो
सावरती हे तिथें तयासी.

# मवाली

असे मवाली पाहुनि होतों
मीही कांहीं वेळ मवाली
विडी कुणाची बसतों फुंकित
आडोशास पुलाच्या खालीं.
कपडे होती क्षणांत चिंध्या
धूळ रापते मम केसांतुन
नजर उसवते नेत्रामधली
सभ्यपणाचें सुटतें बंधन.
उशाखालच्या पाषाणाची
बसते माझ्या मिठी मनाला
पावन कोमल मंगल लागे
कापुर होउनि जळावयाला.
उदरामधलें जहर भुकेचें
सर्वांगांतुनि लहरत जातें
धुक्यांत विरती परिचित रेषा
संस्कृतिशीं ना उरतें नातें.
इमारतीवर रक्त पाझरें
कुलांगनांच्या होत रखेल्या

कवच रित्या शब्दांचें फुटतें
दिसती अस्थी देहामधल्या.

शून्य अवस्थेमधें भयानक
जाण मनाची मम साकळते

विनाश व्हावा अवघा भवती
एकच हें संज्ञेला कळतें.

बापू गोखले

चौरंगावर नहात होत्या
मलमलींतल्या मादक बाया
टिपीत होते माडीवरुनी
डोळे लालस
फुटक्या भिंगांतुनि गळणारा
लखलखणाऱ्या लावण्याच्या
ज्योतींचा रस.
रात्रीच्या पायांत बांधले
होते पैंजण
मृदुल गालिचावरी नाचती
सुरतशील संगीत बाहुल्या
रसराजानें घमघमलेल्या
गीतांतिल शब्दांतुनि गळती
कैफाचे कण.
ऐश्वर्याच्या कलेवरावर
बसला होता हिंस्त्र खगांचा
थवा अधाशी
पाटपलंगावरी जिण्याची
लाभत होती कृतार्थता त्या
रसिक जनासी
कथेकऱ्यांस्तव फिरती मेणे
राजविलासी

क्रमांक ....१५५६........ नों. दि. ...

प्रशंसकांना प्रशासकाची
        मिळे मिजासी
खटानटांच्या या पेठेंतुन
अव्यभिचारी विशाल निष्ठा
        हो वनवासी.
गोंधळांत या गर्जत उटला
        एक तुझा स्वर
एक पहाडापरी उभा तूं
खुजेपणाच्या या माळावर,
एक मनोरा विध्वंसांतुन
काळाला आव्हान देउनी
        उभा तळावर.
विद्ध मनानें, विद्ध करानें
रुतलेलें रथचक्र उपसण्या
सूर्यसुतापरि तूं एकाकी
        करसी संगर,
पराक्रमासह वीरनायका
दिव्य एकलेपणा तुझा हा
मुद्रित झाला अमरपणानें
        इतिहासावर.

## पुनव

आज कार्तिकी पुनवेवरती
श्वेतकमल तव समीपतेचें
फुललें आहे
कलहंसापरि हास्य रेशमी
संगमरवरी या स्तंभावर
बसलें आहे.
अवकाशांतिल निळ्या रुपेरी
कळीकळीवर
आर्त तुझ्या दृष्टींतिल पडलें
आहे दहिंवर.
मंदोत्कट वाऱ्यानें लहरत
अशब्द होउनि अवघडलेलीं
झाडें हलती
त्या पर्णांतुनि तव शब्दांपरि
पराग कांहीं चंद्रफुलांचे
खालीं गळती.
तुझेंपणाचें रूप दावण्या
दूरपणांतुन
आज जाहलें विलग चांदणें
चंद्रापासुन.

# वेगळें

—किती लतांस्तव तुझे समीरा
    पुलकित झाले कर
किती फुलांवर बरसत भ्रमरा
    या गीताचे स्वर !—
सहजच पुससी, गोंधळलें मन
    सत्य असत्यांतरीं
वावटळींतिल धूम्रघनापरि
    बावरली वैखरी.
स्फटिकासम तव अमल निरागस
    मनोभावनेपुढें
रिते करूं का कलुषित चंचल
    हे चिखलाचे घडे !
अवघडलेल्या त्या मौनाचीं
    गळलीं कांहीं पिसें
—स्मरे न आतां—काय तयाचें—
    वदलों कांहीं असें.
परी इथें मी मधुकर नाहीं
    ना मधुचें गायन
अपार्थिवाचें स्वैरपणाला
    हें पहिलें दर्शन.

## बाजीराव

[ एक मनोगत ]

तुफानाच्या मंदिरांत
आपण दोघांनीं बांधली आहे पूजा
तुफानाच्या उपासकांना
या संसारांत आहे सजा
जन्मभर अशांतीची.

तुफानाचा वरदहस्त
माथ्यावरती पडल्यावर
वाट गवसत नाहीं कधींहि
विश्रांतीची.

तृणाच्या हिरव्या लकेरींनीं
फुलून येत नाहीं कधीं
आपल्या जीवनाचा किनारा,
जीर्ण वडांतील भुताटकीचा
प्रवाहांत पाय टाकून
तीरावर बसला आहे पहारा
—कायमचा.

उलगडत नाहीं आपल्या अंधारावर
स्निग्ध सोनेरी रेशीम
समईंतील किरणांचें,
विक्राळ मेघांच्या द्वंद्वांतून

उन्मत्त विजांच्या धारा
उधळतात आपल्या रस्त्यावर
भैरव तराणे
मरणांचे.

वाहात नाहीं आपल्यासाठीं नदी
पहाटच्या पलंगावरील
रतितुष्ट पुरंध्रीसारखी
प्रसन्न नम्र लाघवी,
गर्जत आहेत लक्ष लाटा सागरांतील
गरुडाने घायाळ केलेल्या नागिणींसारख्या
उफाळलेल्या
माहुताला मारून
पळत सुटलेल्या हत्तिणींसारख्या
पिसाळलेल्या.

उघडत नाहींत आपल्यासाठी
सुगंधानें निथळलेल्या
—प्रकाशानें उजळलेल्या
आरस्पानी महालांचीं कवाडें,
पायांतील साखळदंड ओढीत
आपण धावतों आहोंत दोघे
अखंड

मृत्यूच्या क्षितिजाकडे.

# गीत

तुला गायचें होतें तेव्हां
मलाहि होतें ऐकायाचें
त्या स्वरजालीं होतें कांहीं
रहस्य अद्‌भुत धरावयाचें.

त्या गीताला परंतु नाहीं
शरीर शब्दांचें सांपडलें
अनाकार तें–पाउल त्याचें
आकाराच्या द्वारीं अडलें.

शत रागांच्या रचनेचेही
बंध तयाला अपुरे होते
ठराविकांतिल गणमात्रांशीं
गवसत नव्हतें त्याला नातें.

धुकें मनांतिल मनांत जिरलें
नेत्रदलावर जमलें दहिंवर
त्या थेंबांतुनि ऐकूं आले
अखेर कांहीं ओझरते स्वर.

# अरूप

नांव कशाला हवें अशाला
ज्यास न कारागृह रेषांचें
अरूपतेला रुतती ज्याच्या
अरुंद कंगोरे भाषांचे !

अस्तदिशेवर दिनान्त होतां
अलौकिकाचा रस हेलावे
त्या दृश्यांतुनि व्यर्थ कशाला
परिचित कांहीं चित्र पहावें ?

विजनामधल्या भग्न मंदिरीं
वादळ घुसतें करतें नर्तन
गभीर भैरव त्या नादाला
कुठलें रागलयीचें बंधन ?

असेंच कांहीं कांहीं घडतें
नाहीं ज्याला नांवनिशाणी
रूढ पथाच्या पलीकडे हीं
गगनामधलीं धूसर गाणीं.

## पणती —

असाच केव्हां थिजून पडतो
संथ घनावर वारा
हारवतें नभ हरवे त्यांतिल
प्रकाशदायी तारा.
जहाज राही अचल जलावर
प्रवास कुंठित होई
मरणाहुनही कळा भयानक
अशी जिण्याला येई.
गळती रेषा चराचरांच्या
जळतें तृण नांवांचें
कठोर होई बर्फ मनांतिल
कोमल भावदंवाचें.
भयाण त्या पोकळींत जीवन
सुन्नपणानें भ्रमतें
असेनसेच्या सीमेवरती
अगतिकतेनें बसतें.
अशा अभावीं वहात येते
तव हांकेची पणती
प्रकाशांत त्या आहे त्याचें
सूत्र पुन्हा ये हातीं

## स्पर्श

डोहावरील सावल्या थरथरतात
तीरावरील वृक्षांच्या जाळींतून
उषःकालचे सोनेरी किरण
नितळूं लागले म्हणजे.

गुहेंत धुमसलेला काळोख
भयभीत होतो
एकाकी भयाण पायवाटेवरून
दिव्याचा संथ निश्चल प्रकाश
पुढें येऊं लागला म्हणजे.

जमिनीच्या गर्भामध्यें
दगड होऊन पडलेलें माझें मन
भयानें व्याकुळ होत आहे
तुझा जीवनदायी प्रेमस्पर्श
जवळ येत आहे म्हणून.

## यमुना

हीच सखी ती नंदसुताची
राधेच्या रमणाची
हीच प्रेरणा पुरुषार्थांची
कंसाच्या मरणाची !

या सरितेचा गहन गर्व हा
दुथडी भरुनी वाहे
इतिहासाचें विराट नाटक
हिनें पाहिलें आहे.

इथेंच पाउल सलील श्यामल
ईश्वरतेचें पडलें
अपारतेंतिल एकाकीपण
हिनेंच हृदयीं धरलें.

प्रमत्त जेव्हां दैत्य मातले
झाले शाप धरेला
हिनें बांधलें खड्ग रणाचें
गवळ्यांच्या कमरेला.

याच जलानें दिली जगाला
गीतेची प्रभुवाणी
कुंजवनांतिल अतुल प्रीतिचीं
इथेंच घडलीं गाणीं.

या तीरावर अजून भरते
घट अजरामर राधा
अजून त्या स्वरविमोहनाची
हवेंत आहे बाधा.

# ताज

महाद्वार ओलांडून
मी पायऱ्या उतरतों आहें
आणि सायंकाळच्या
        धूसर सोनेरी प्रकाशांत
ईश्वराच्या मंदस्मिताप्रमाणें तरंगणारें
तें श्वेतशिल्प
उभें राहात आहे समोर
दृष्टीला आव्हान देत
माझ्याच नव्हे, तर सर्व मानवी विश्वाच्या.

होय—
माणसाला मिळालेली दर्शनाची देणगी
या चिरंतन शुभ्र स्वप्नासमोर
        होत आहे कृतार्थ.
काड्याच्या पेटीपासून चित्रपटापर्यंत
सहस्र जागीं पाहिलेल्या जाहिरातींनेंहि
घेतली नाहीं हिरावून
        याची दिव्यता, अपूर्वता.

संहारक अस्त्रांनीं दुखावलेल्या आकाशाच्या
एका निवांत निर्मळ कोपऱ्यांत
द्वंद्वाच्या क्षोभाच्या अशांतीच्या
        पलीकडे असलेल्या प्रदेशांत
उभा आहे हा एकाकी—
विशुद्ध सौंदर्याचा संचय
माणसाच्या पुनरुत्थानाची प्रतीक्षा करीत.

# कैलासलेण्यांत

ज्योती विझतिल लक्ष दिव्यांतिल
पण दीप्तीला अंत नसे,
कोट्यवधी मरतील माणसें
मानवमन पण अमर असे.

प्रज्ञेवांचुन संज्ञेवांचुन
साकळलेलें जीवन तें
कल्पकतेनें पुलकित झालें
हो प्रतिभेनें पावन तें.

गहन तमाला दीप मिळाला
रवतेला नाद मिळे
स्वरलहरींना गीत मिळालें
रित्या नभाला साद मिळे.

निराकार जें त्यांत प्रगटली
अलकानगरी रेषेची
गवसे जागृत दगडांनाही
दिव्य देणगी भाषेची.

शब्दशिवानें अमर जाह्नवी
दिली भवाला रसमय ती
इंद्रधनूच्या रंगशलाका
अंकुरल्या या भूवरतीं.

इतिहासाचीं जुळलीं पानें
युगांयुगांचा बंध जडे
कालनदीच्या तीरावरतीं
मशाल चाले हीच पुढें.

चराचरावर सुंदरतेच्या
कलशामधुनी सोम झरे
संसाराच्या शिरिं लखलखले
चिरंतनाचे ताज तुरे.

त्या प्रज्ञेचें दर्शन येथें
तें प्रतिभालय मंगल हें
पृथ्वीवरती अवतरलेल्या
ईश्वरतेचें पाउल हें.

# माता

मध्यरात्र उलटून गेली आहे
काळ्याजांभळ्या सांवल्या
माझ्या अंगणांत उभ्या आहेत
भिंतीला बिलगून,
आकाश पडलें आहे रिकामें
शब्दावांचून,
प्रकाशाचे अंधुक थेंब निथळत आहेत
क्षितिजावर कलंडलेल्या
रुपेरी कलशांतून,
निःशब्द निराकार कांहीं तरी
सरपटत आहे हलकें हलकें
कोमेजलेल्या दिशांतून.

कोठल्या तरी अबोध भीतीनें
मी दचकून उठतें
आणि घेऊन बसतें
तुला छातीशीं.
कसली भीति आहे ही ?—
उंबऱ्यापर्यंत ओघळून आलेल्या
त्या गूढ शब्दहीन सावल्यांची ?
क्षितिजावरील पर्वतांच्या रेषा
पिंजलेल्या मेघांच्या राशींत
सर्प होऊन संथपणानें शिरत आहेत
त्या रेषांची ?

दूरवरच्या जंगलांतील वृक्षांवर
निद्रिस्त वादळाचीं पिशाचें
फांद्याफांद्यांवर लोंबकळत आहेत
त्या वादळाची ?

पृथ्वीच्या चरणशिलेवर पाय ठेवून
अंतराळांत बसलेला विचारमग्न ईश्वर
कोणाचे तरी ललाटलेख लिहीत आहे
त्या ईश्वराची ?

मी आवेगानें ओढून घेतें तुला
माझ्या पदराखालीं
येथें तुझें अमंगल करण्याची आज्ञा नाहीं
कोणाचीहि—

सावल्यांची, पर्वतांची, वादळाची
आणि ईश्वराचीहि !



स्व...४

## पांथस्थ

अज्ञाताच्या गूढ धुक्यांत
अस्पष्टपणें तरळणाऱ्या तुझ्या अस्तित्वापर्यंत
कोणाचीं पावलें कधीं पोहोंचलीं नाहींत,
माझींहि पोहोंचणार नाहींत.
आणि तरीहि—
त्या असाध्याकडे जाणाऱ्या मार्गांवर
मी जातों आहें पुढें, सारखा पुढें—
गतीनें बधिर झालेल्या माझ्या मनाला
आतां स्मरण उरलें नाहीं त्या स्थळाचें
ज्याच्याकडे मी जात आहें.
आणि राहिली नाहीं आवश्यकता
तेथपर्यंत पोहोंचण्याचीहि.
कारण या गतींतच आहे त्या श्रेयाचें संपादन
या प्रवासांतच आहे
प्रवासाची अंतिम सांगता

# जाणीव

माझ्या अनुमतीची प्रतीक्षा न करतां
ही अजस्र लाट
माझ्या जीवनावरून जात आहे
अफाट वेगानें :

तो राक्षसी प्रवाह वरून जातांना
माझें अंतःकरण गुदमरतें आहे
दूरपणांत पोसलेली माझी अहंता
जागोजाग चिरते आहे,

विलग व्यक्तित्वाच्या कडा
होत आहेत अस्पष्ट आणि रंगहीन
सायंकालीन क्षितिजाप्रमाणें.

ती प्रचंड लाट ओसरल्यावर
( आणि दुसरी येण्यापूर्वी )
मी भांबावून पाहतों सभोवार
त्या मध्यंतरांत,

मला होते जाणीव—एक क्षणभर—
मी नाहीं अनेकांतील एकमेव
तर आहें केवळ अनेकांतील एक
सर्वांतील, सर्वांचा आणि सर्वांसाठीं.

## माध्यान्ह

एका खेड्यांतील—

पाहात आहेत सारींजण
भांबावून—
धुळावलेले वृक्ष
इतस्ततः ओघळलेल्या सांवल्या
अंगावरती ओढून—
जुनाट इमारतींचीं उजाड धाबीं
थरथरणारे म्हातारे हात
छातीवरती रोवून—
दूरस्थ डोंगराच्या पाठीशीं लपलेले
वाऱ्याचे सहस्र झोत
सशांसारखे डोकावून—
आभाळांत जागोजाग लोंबणारे
राखाळ मेघांचे तुकडे
आपले उदास निर्जीव डोळे
विस्फारून—
पाहात आहेत सारींजण भांबावून
काळ्या पिवळ्या अफाट माळावर
हातपाय पसरून पडलेला
अक्राळविक्राळ
उघडा नागडा उन्हाळा.

# अंधार

काय हवें तें मला कळेना
कुठें असें तें मज गवसेना
काय कुठेंच्या घन अंधारीं
जें आहे तें—तेंहि दिसेना.

## नाटक

नायक मी खलनायकही मी
सूत्रधार मी मीच विदूषक
विविध भूमिका करितां करितां
मीपण आतां कुठलें शिल्लक !

क्रमांक ... १५५६ ...... नों. दि. ८/३/

# जलाशय

एक दृश्य–

मावळतीच्या ओठावरची
कुस्करलेल्या स्पर्शफुलांच्या
देठावरची

प्राशन करुनी तांबुस मदिरा
भव्य बिलोरी काच होउनी
धुंद तृप्त शांतींत निरामय
क्षितिजाच्या त्या दरडीखालीं
पडे जलाशय.

सभोवारचे पिवळे डोंगर
जळक्या खुरट्या तृणांकुरांच्या
घालुनि कफन्या

विस्फारुनियां कठोर डोळे
सांजकालच्या मंद प्रकाशीं
लखलखणाऱ्या त्या शांतींतिल
शोधति अन्वय.

# औरंगाबाद

## एक आठवण—

जीर्ण तटाच्या समीप आहे
खंदक आणि—
तयांत आहे खोल तळाशीं
हिरवें पाणी

मी डोकावुनि खालीं बघतां
अरुंद काळ्या घळईमधुनी
थरथरलें तें म्हातारें जळ
क्षीण स्वरानें
बुरुजाच्या भिंतीला धरुनी
एक करानें
शेवाळ्यामधिं हारवलेले
उचलुनि जड काचेरी डोळे
कापत कापत
रुग्णपणानें कण्हत म्हणालें
स्वागत पांथा
स्वागत.

# यंत्र

अंगावरतीं वस्त्रें खाकी
शस्त्रें अवजड कटिखांद्यावर
सैनिक चाले रणांगणाला
ताठर माथ्यावरती घेउन
मृत्यूचा कर.

काय मनामधिं या यंत्राच्या
अथवा उरलें आहे का मन,
पगार कांहीं भत्ता कांहीं
त्यासाठीं हें वेदीवरती
चढलें जीवन.

यंत्र पितें हें केव्हां मदिरा
दिसतें कधिं वेश्येच्या द्वारीं,
परी वाहतें हेंच शिरावर
संस्कृतिमंगल राखायाची
अमुच्यासाठीं प्राणपणानें—
जबाबदारी.

## परतफेड

पृथ्वीवरील मातीचे कण
अपार काळोखाच्या तळाशीं
पडले होते.

नव्हता आशय, नव्हती गती
नव्हता विकास, नव्हती ज्योती
आंधळें अस्तित्व ठिपकत होतें
काळाच्या डोहांत.

औदार्याच्या कोठल्या ऊर्मींत
या कणांना तूं म्हटलेस माझे
मातींतून उमललीं चित्रें
सुंदर देहाचीं, मनोहर रूपाचीं.

अचेतन पावलांना दिलीस गती
निःशब्द कंठांना दिलास स्वर
दिलास प्रकाश
दिलेस वास्तव्यासाठी
अवघ्या धरतीचें घर.

सजीव झालेल्या या मातीनें मात्र
आज दिली आहे वेदना
तुझ्या हृदयाला
दिलीं आहेत आसवें
तुझ्या नेत्रांना !

# तृणाचें पातें

आश्विन पिउनी तरारलेलें
एक तृणाचें गोंडस पातें
मला म्हणालें डुलतां डुलतां,
—जीवित म्हणजे रहस्य मो

—कालच रात्रीं नऊ काजवे
आले शिलगावूनि मशाली
शोधित फिरती चहूंकडे ते
इथें तिथें त्या झाडाखालीं.

—विचारलें मीं शंभर वेळां
काय आपुलें हारवलें तें
मौन सोडलें कुणी न, कारण
त्यांनाही तें ठाउक नव्हतें.

—जाग पहाटे येतां दिसला
क्षितिजावर एकाकी तारा
पडला होता ढगावरी तो
रेलुनि तंद्रीमधें बिचारा.

—मीं म्हटलें त्या,—घराकडे जा
जागरणाचें व्रत कां भलतें
तो रागानें बघे मजकडे
कारण त्यासहि माहित नव्हतें.

—पलिकडच्या त्या आंब्यावरती
कुणी सकाळीं आला पक्षी
खोदित बसला आकाशावर
चार स्वरांची एकच नक्षी

—मीं पुसलें त्या—कोणासाठीं
खुळावल्यागत गासी गीतें
पंख झापुनी उडुनी गेला
कारण त्यासहि कळतच नव्हतें.

—दूर कशाला, मी वाऱ्यावर
असा अनावर डोलत राहीं
कां डुलतों मी, कां हसतों मी
मलाहि केंव्हां कळलें नाही.

## परंतु

प्रतिभेच्या दिव्यदर्शी नेत्रांना
जें दिसलें नाहीं कधींहि
तें उभें राहिलें आहे आज
पृथ्वीच्या दाराशीं.

अनंत आकाशाची गहनता
उणावली आहे लक्ष योजनांनीं
विश्वरचनेचा नकाशा उकलत आहे
शास्त्रज्ञाच्या मेजावर.

परंतु—
हें आकाशस्थ ऐश्वर्य स्वीकारतांना
ओंजळींतून ओघळत आहे देणगी
यात्रेच्या प्रारंभकालीं मानवाला
मायमातीनें दिलेली.

# नदी

सर्वांची तृषा शमन करणारी ही नदी
स्वतः तृषित आहे अनादि कालापासून
आणि राहणार आहे तशीच
अनंत कालापर्यंत.

ती पिऊन टाकते
तीरावरचे अजस्र कठोर वटवृक्ष
आणि त्यांच्या पायापाशीं थरथरणारें
भित्रें नवथर गवतहि.

ती प्राशन करते
घाटावरचीं विशाल दगडी देवालयें
आणि त्यांच्या पायऱ्यांवर तेवणाऱ्या
धिटुकल्या सोनेरी ज्योतीहि

अधीर ओठांनीं ती सेवन करते
आकाशांत भ्रमण करणारीं तेजस्वी नक्षत्रें
आणि त्या तेजोगोलांना आश्रय देणारें
गूढ सनातन आकाशहि.

# नदी

सर्वांची तृषा शमन करणारी ही नदी
स्वतः तृषित आहे अनादि कालापासून
आणि राहणार आहे तशीच
अनंत कालापर्यंत.

ती पिऊन टाकते
तीरावरचे अजस्र कठोर वटवृक्ष
आणि त्यांच्या पायापाशीं थरथरणारें
मित्रें नवथर गवतहि.

ती प्राशन करते
घाटावरचीं विशाल दगडी देवालयें
आणि त्यांच्या पायऱ्यांवर तेवणाऱ्या
धिटुकल्या सोनेरी ज्योतीहि

अधीर ओठांनीं ती सेवन करते
आकाशांत भ्रमण करणारीं तेजस्वी नक्षत्रें
आणि त्या तेजोगोलांना आश्रय देणारें
गूढ सनातन आकाशहि.

ती पिऊन टाकते आधाशीपणानें
संधिकालांतील रंगित मेघांच्या मिरवणुकी
आणि उत्तर रात्रीच्या उदरांतून गळणारा
भयाण निराकार काळोखहि.

एवढेंच नव्हे—
तिनें पिऊन टाकला आहे
संसारांतून अदृश्य झालेला सारा भूतकाल
( आणि मला वाटतें )
आमच्या दृष्टीला आज अदृश्य असलेला
सारा भविष्यकालहि.

# ऐनेमहाल

मानववस्तीपासून दूर—
अमित अंतरावर
धारस्पानी आकाशाच्या तळाशीं
उभा आहे हा ऐनेमहाल.
स्वप्नांच्या शिलांनीं घडविलेला
नवरत्नांनीं मढवलेला
मातीचा स्पर्श होऊं नये म्हणून
स्फटिकाच्या उंच
चौथऱ्यावरती चढवलेला.
चांदण्याचा रुपेरी द्रव
थिजून पडला आहे झाडांच्या फांद्यांवर
सहस्रावधि पुष्पांच्या पत्या
ओतीत आहेत सुवासाचे मंतरलेले कलश
जड, कुंद, अचेतन हवेवर.
दारावर बसला आहे पहारेकरी
आंत सोडीत नाहीं कोठलीहि वेदना
दूरवरच्या जगांतली,
जवळ येऊं देत नाहीं कोठलीहि जाणीव
अदृश्यांत आकारणाऱ्या युगांतली.
महालामध्यें आहे
सारें ऐन्यांचें बांधकाम
भिंतीला ऐने, जमिनीला ऐने, आढ्याला ऐने,
बिलोरी ऐने, रंगीत ऐने

रूप दर्शविणारे, रूप लपविणारे ऐने
उभवणारे, लांबवणारे
चौकोनाचे त्रिकोण, त्रिकोणाचें वर्तुळ करणारे
क्षुद्राला विशाल, विशालाला क्षुद्र करणारे
चित्रविचित्र ऐने!
ऐनेमहालांतील हे रहिवासी
सतत मग्न असतात, आत्मदर्शनांत.
विविध दर्पणांचे अभिप्राय अजमावण्यांत.
पितात चंद्रिकेची माधवी,
खातात कमलपुष्पांच्या कळ्या
आणि बघत बसतात दिवसरात्र आरशामध्यें.
एका ऐन्यांतील स्वरूप पाहून
हसतात, बहरतात,
दुसऱ्या ऐन्यांतील विद्रूप पाहून
रागावतात, रडतात, शहारतात,
आणि अखेरीं—
रिकामपणा मारण्यासाठी
स्वतःच्या प्रतिबिंबाशीं लढतातहि.

## नांदी

महन्मंगला परमसुंदरा हे शिवगंगाधरा
सदय होउनी या भूमीचें आज शिवालय करा ॥

निवास देवा तुम्हा सनातन हिमाचलाच्या शिरीं ।
तीन काल धरतात मस्तकीं तुमच्या अबदागिरी
यशसंकीर्तन करतां झाली कृतार्थ वागीश्वरी
जटेंत गंगा भाळावरती चंद्राचा बिजवरा ॥

अष्ट दिशांचीं गगनें ज्यांच्या स्पर्शास्तव वाकलीं
प्रकाशगंधित ग्रहताऱ्यांची ज्यावर पुष्पांजली
स्वर्गवाहिनी करावयाला प्रक्षालन पातली
वत्सल त्या पदकमलीं लाभो भक्तजनां आसरा ॥

सकल जनांच्या कल्पलता या चरणावर विकसती
दिव्य जीवनामधें येथ ये मातीला जागृती
क्षणमात्राला इथें लाभते चिरंतनाची गति
करा कृपेनें पूजांगण हें पावन दुर्गांवरा ॥
महन्मंगला परमसुंदरा हे शिवगंगाधरा ॥

## सीमेवर

काळोखाच्या सरहद्दीवर
उषःकालचा दिव्य नकाशा
घडतो आहे

रातपशूंचा शिकारखाना
अंधाराच्या फटीफटींतुन
रडतो आहे.

जीर्ण नीतिचें मळकें विटकें
सुटलें सोळें म्हणून कोणी
दळतो आहे

यंत्रामाजीं स्वप्न गवसलें
म्हणून कोणी किंचाळत हा
पळतो आहे.

वरच्या फांदीवरचें घरटें
तळास आलें म्हणून कोणी
कण्हतो आहे

गळा काढुनी कुणी नदीवर
परंपरेचे श्राद्ध–पवाडे
म्हणतो आहे.

हरवे आत्मा म्हणून कोणी
हवेंत फिरवित हात थयथया
नाचत आहे

तिमिरामधलें निरर्थ लेखन
उलटा होउनि कुणी तामसी
वाचत आहे.

या ग्रस्तांची, संत्रस्तांची
तमा गतीला नसे, काळ हा
धावत आहे

काळोखाच्या बुरुजावरती
किरण एक तो निशाण पहिलें
रोवत आहे !

## अगतिक

गुहेंत गेलों मी पापाच्या
आणि भेटलों पापाला
दांत शोधला मीं जहराचा
दांतच नव्हते सापाला.

तिथें सावल्या होत्या केवळ
अनंग होउनि पडलेल्या
चघळित होत्या जीवनकणिका
फटीफटींतुनि दडलेल्या

काळोखाच्या वारुळांत त्या
व्यथाहि दाराशींच अडे
लोंबत होते सळ बर्फाचे
मनें गोठुनी चहूकडे.

निराकारता होती अवघी
नव्हत्या रेषा रंग नुरे
भयाण निर्गुण भुताटकीचें
संज्ञेवांचुनि आंत फिरे.

भिंतीवरती मान टाकुनी
पडली होती रुग्ण हवा
तिनें पाहिला नव्हता केव्हां
गगनामधला स्नेहदिवा.

उन्मादाचें कुठें न गाणें
होतें कण्हणें थकव्याचें
निर्दयतेची नव्हती दलदल
वा आमंत्रण चकव्याचें.

तुटलें पाणी नदींतलें तें
ओघ वाहता दूर असे
अगतिकता ती होउनि हिरवी
वाट गतीची पाहतसे.

## स्वधर्म

दिवसाचा गुण प्रकाश आहे
रात्रीचा गुण श्यामलता
गुण गगनाचा निराकारता
मेघांचा गुण व्याकुलता.

श्रेयस्कर तें असो नसो वा
निजधर्माविण नाहिं गति
कैद चराचर अपुल्या ठायीं
त्यांत मुक्तता त्यांत रति.

सांगशील का कधीं धरेला
वहात जा तूं जलापरी
धगधगल्या बिजलीस बसाया
दंवाप्रमाणें फुलावरी ?

तसेंच मीपण आहे माझें
तयासारखें तेंच असें
अपार काळामधें बनावट
एकाची दुसऱ्यास नसे.

अभेद्य असलें अजिंक्य असलें
भलेंबुरें पण तुटेल का ?
तुटल्यावरती आणिक कांही
शून्यावांचुनि उरेल का ?

# कबूतर

नवा असे मी
जुना असे मी
युगायुगांचें सूत्र असे मी
या विश्वाच्या असीमतेचा
पृथ्वीवरचा पुत्र असे मी !
अशी अहंता मनांत केव्हां
ताठर होते—
अनंततेशीं ईश्वरतेशीं
जडतें नातें—
कपाटांतलें क्षुद्र कबूतर
उडून जातें—
परंतु भ्रमतां
गहन पोकळी अधिकाराची
परवड होते पंखपिसांची
शीळ ऐकतां तळीं कुणाची
जीर्ण शीर्ण लक्तराप्रमाणें—
कपाटांतल्या—
कैदेसाठीं—
परतुन येतें.

# रस्ते

मला वाटे चालतों मी
परी आतां कळलें कीं-
वाट मला चालविते.

जन्मापूर्वीं होते माझ्या
रस्ते सारे आखलेले
चोहीकडे रोखलेले

शहरांत चिरेबंदी
विजनांत खडकाळ
पायवाटा रानोमाळ

रस्ते कांही बाजाराचे
रस्ते देवधर्माकडे
रस्ते वामकर्माकडे.

रंजलेले गांजलेले
तसे फूलपंखी कांही
कांही भव्य बादशाही

रस्तेबंदी अशी सारी
करी चाक जीवनाचें
मुक्तपण कल्पनेचें.

## एक फटका

मम शब्दांनो मयासुराच्या
भुलाव्यांत या शिरूं नका
निरर्थकाच्या रंगमहालीं
पदर धुक्याचे धरूं नका
असंभवांतुन भ्रमूं नका
शून्याचा रस पिऊं नका
नदी मातली कुण्या गांवची
घडे भराया धावुं नका.

कल्पतरूवर राजस पक्षी
पिसें मिळाया शिणूं नका
इंद्रधनूच्या पुलावरोनी
पैल जायचें म्हणूं नका
आकाशाची असीम महती
गणूं नका पण हिणकस माती
ज्वलनास्तव जर जन्म आपुला
जळावयाला भिऊं नका.

# दिवे

हरवें आकाश
हरवे धरती
पोलादी काळोख
  साचला भोवती.
पिसाट वादळ
घोंगावतें केव्हां
आधार नभाचे
  पृथ्वीचे कापती.
वृक्षांच्या काजळी
भुताट सावल्या
भयाण विक्षेप
  अंगांचे करती.
केधवा मेघांचा
कडाडे मजला
विजेचे प्रपात
  अंधार चिरती.
ओसंडतां धारा
मृत्यूचीं सहस्र
बर्फाळ बोटें तीं
  जीवन शोधतीं.
अघोर या रात्रीं
सहपांथा, हवी
कल्पनेंत जागी
  दिव्यांची वसती.

## पाणी

काळोखासहि फुटलें काळिज
पिचण्यासाठीं आज असें हें
लावुनिया टक भ्रमिष्ट वारा
इमारतीच्या भग्न तटावर
बसला आहे !
निराकार गगनाचीं शून्यें
धुमसत फिरतीं
उभा राहिला थवा घनांचा
मार्गावरती.
करुणेचा द्रव नक्षत्रांच्या
निळ्या पापण्याखालीं जमला
स्नेहशील धरतीच्या हृदयीं
गहिंवर भरला.
आर्त स्वरानें
दुःखभरानें
पुसती अवघे परस्परांना
वातावरणीं
कशी जलानें केली असली
अवटित करणी !

मराठा ग्रंथ संग्रहालय स्थळ
अनुक्रम ३२३७० वि काव्य
क्रमांक ९४४६ नों: दि: ८/३

# गति

रात्रीच्या या रस्त्यासाठीं
पावलांस येई गति
अस्ताव्यस्त सावल्यांत
सर्व रूपें दिवसाचीं
मावळतीं.

अनोळखी वाटेवर
क्षीण दिवे पेंगतात
स्तंभ स्तंभ आक्रमीत
पाय माझे चालतात
चालतात.

शीण सरे चालण्याचा
चालीस ये आपापता
रस्ता शिरे पावलांत
तोच धनी चालविता
झाला आतां.

रात जागे भोवताली
वाजे अदृश्यांत चाल
अंधाराच्या कपारीला
पेटलेला आहे जाळ
कोठें तरी.

वाट चाले तंद्रीमध्यें
पुण्याकडे पापाकडे
मीच झालों वाट आतां
एक फक्त जाणवतें
जाणें पुढें !

## ईशावास्यम्
### कांहीं भाषांतरें

पृथ्वीवरती जें जें जीवित
ईशात्मक तें आहे सारें
त्यागानें कर आत्मसमर्पण
भोगाचा अभिलाष नको रे.

~

शतायुषी हो कर्म साधनीं
कर्मफलाची नको वासना
अशा अलिप्तामधून लाभे
पावनता पार्थीव जीवना.

~

निजरूपीं जो जगास बघतो
जगांत बघतो रूप आपुलें
सिद्ध मुक्त तो तोच महात्मा
शोक मोह मग त्याला कुठलें ?

~

व्यथातीत तनुरहित प्रकाशित
अपाप निर्गुण, त्यासी मीलन
ज्याचें तो कवि मुक्त मनीषी
साध्य तया सर्वार्थ सनातन.

~

अचल असोनी तें चल आहे
जवळ असोनी दूर असे तें
चराचरांतुनि भरलें आहे
तरी तयांतहि वसत नसे तें.

देव प्राप्त ज्या, प्राप्त न देवां
अचल एक तें शीघ्र मनाहुन
तें स्थिर राहुनि गतीस जिंकी
करि सृष्टींतील नियमित जीवन.

तें विद्येच्या अतीत असुनी
भिन्न अविद्येपासुनि आहे
दर्शनदान जयांनीं केलें
त्या धीरांचें वचन असें हें.

उपासती जे मात्र अविद्या
अंधतमाच्या तटांत भ्रमती
जे विद्येंतच रत झालेले
अधिक भयावह तमांत रमती.

आत्महनन ते करिती केवळ
आत्मयोग ज्यां अभिमत नाहीं
असुर लोक त्या पैल जिथें ना
काळोखाविन दुसरें कांहीं.

विद्याविद्या जाणुनिया जे
या ज्ञानास्तव असती जागृत
मरण अविद्येनें ते तरती
विद्येनें त्या लाभे अमृत

अनुक्रम 3230 वि: ........
क्रमांक 944६ नों दि ८/3/८२

# राजा आणि मंत्री

शकार झाला राजा तेव्हां ठकार झाला मंत्री
प्रकार झाले नाना त्यांची किती करावी जंत्री !
मंत्री सांगे उपमंत्र्याला तुमान आकाशास शिवा
शिंप्यांचें जें वेतन होइल हिस्सा मजला त्यांत हवा.
राजा वदला उजेड रविचा हजार हौदांमधे भरा
दिवे तयाचे रात्रीं लावा, कां तेलाचा खर्च करा ?
मंत्रि म्हणाला हवी कशाला रखवाली ही चहूकडे
द्या सगळें धन माझ्याजवळीं इथेंच करतों सैन्य खडें.
राजा वदला पगार कसला काम करावें भक्तीनें
उपास पडले पर्वा नाहीं, पुण्य लाभतें सक्तीनें.
मंत्री कळवी प्रजाजनांना आत्म्याचें दारिद्र्य हरा
राजा सांगे असार जीवित परलोकाचा मार्ग धरा.
मंत्रि म्हणाला मति राजाची हिमाचलाहुनि तुंग असे
राजा वदला या मंत्र्याच्या पगडीखालीं शिंग असे !

आम्हां घरीं —

आम्हां घरीं आहे
शब्दांचेंच धन–
( खंत नाहीं त्याची
जाणवतें पण— )
शब्द देतां घेतां
झालें आहे आतां
शब्दांचेंच मन !

ग्र. क्र. ९२६८०
REFBK-0012747
REFBK-0012747

# वि. वा. शिरवाडकर यांचीं पुस्तकें

## काव्य

जीवनलहरी
विशाखा
समिधा
किनारा
मेघदूत
मराठी माती
स्वगत

## कथाकादंबरी

फुलवाली
सतारीचे बोल
वैष्णव
जान्हवी
कल्पनेच्या तीरावर
कांही वृद्ध व कांही तरुण

## नाट्य

दूरचे दिवे
दुसरा पेशवा
वैजयंती
राजमुकुट ( मॅक्बेथ )
कौन्तेय
ऑथेल्लो
दिवाणी दावा
देवाचें घर
नाटक बसतें आहे

## ललित–निबंध

आहे आणि नाही

किंमत : साडेतीन रुपये

## आगामी

**कमण्डलु**

कवि यशवन्त

**काव्यवाहिनी खंड ३**

संपादक :

जोग-कुसुमाग्रज